# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक २३६ वा गुरूवार दि.१३ मार्च २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.







## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ७० फुटी पुतळा व स्मारक, नाट्यगृह शादीखाना, विलासराव देशमुख मार्ग, पानगाव चैत्यस्मारक, सुरतशहावली दर्गा परीसर विकासासाठी निधी दयावा - माजी मंत्री आमदार अमित देशमुख

लातूर/ प्रतिनिधी :- महाविकास आघाडी विधानसभेची निवडणुका हरली असली तरी आम्ही हिम्मत हरलेली नाही असे स्पष्ट करून, लातूर आणि महाराष्ट्रातील अनेक विकास कामे निधी अभावी रखडलेली आहेत, त्या कामाला आवश्यक असलेला विकास निधी देण्यात यावा अशी मागणी आज विधानसभेत अर्थसंकल्पावरील चर्चेत सहभागी होताना माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख केली. विकासाच्या प्रश्नावर आम्ही सदैव आग्रही राहणार असल्याचे सांगून लातूर येथे उभारण्यात येत असलेले परमपूज्य भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ७० फुटी पुतळा व स्मारक, आदरणीय विलासराव देशमुख मार्ग, नाट्यगृह, शादीखाना, भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे पानगाव येथील चैत्य स्मारक, सुरत शहावली दर्गा परिसर विकास यासह अनेक विकास कामे निधी अभावी रखडलेली आहेत, त्यासाठी निधी उपलब्ध करून द्यावा अशी मागणी यावेळी केली. महाराष्ट्र विधीमंडळ अर्थसंकल्पीय अधिवेशनात माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी बुधवार दि. १२ मार्च २५ रोजी अर्थसंकल्पावरील चर्चे दरम्यान विधानसभेत बोलतांना म्हटले की, नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणूक निकालाचा स्ट्राइक रेट मांडलेल्या या अर्थसंकल्पात पाहयला मिळाला आहे. या अर्थसंकल्पात सर्वाधिक विकासनीधी असलेल्या राट्रवादी पक्षाच्या मंत्री असलेल्या खात्याला ५६ हजार ५०० कोटी, भाजप मंत्री असलेल्या खात्याला ८९ हजार कोटी, शिवसेना मंत्री असलेल्या खात्याला ४१ हजार ६०६ कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे. राज्याच्या अर्थसंकल्पात विरोधकांसाठी निधी वाटपात दुजाभाव व्हायला नको होता. लाडक्या बहीणींना अपात्र ठरवून वगळू नये अर्थसंकल्पात लाडकी बहीण योजनेसाठी कमी केलेली तरतूद लक्षात घेता. या योजनेतील वगळण्यात आलेल्या महिलांची संख्या ९ लाख होणार असल्याचे सांगण्यात येत आहे. निवडणुकीपूर्वी पात्र ठरलेल्श लाडक्या बहीणींना निवडणूकीनंतर अपात्र ठरवणे योग्य नसल्यचे सांगत बहिणीला अपात्र करू नका अशी विनंती आमदार देशमुख यांनी भाषणाच्या प्रारंभी केली. दावोस गुंतवणुक बाबत श्वेतपत्रीका काढावी दावोसमध्ये झालेल्या कराराप्रमाणे महाराष्ट्रात जवळपास १६ लाख कोटी रुपये परकीय गुंतवणूकीचे प्रकल्प येणार असे सांगीतले आहे. मागच्या वर्षी दावोसमध्ये ५ लाख कोटी गुंतवणुकीचे दाओसमध्येच करार झाले होते त्यांचे काय झाले त्याचा तपशीलही अर्थसंकल्पात नाही. महाराष्ट्राला आंतरराष्ट्रीय उद्योगकेंद्र बनवण्याची घोषणा पून्हा एकदा आजच्या अर्थसंकल्पात करण्यात आली आहे ती फसवी वाटते. राज्यसकारच्या प्रयत्नातून राज्यात किती गुंतवणूक आली, किती उदयोग उभारले, किती रोजागार मिळाला. राज्यात सर्वांत नवीन उदयोगाची आवश्यकता विदर्भ आणि मराठवाडयात आहे, असे असतांना या भागात गुंतवणूक वाढावी म्हणून सरकारचे लक्ष नाही, बाबत काहीच माहीती देखील नाही. या संदर्भाने सविस्तर आकडेवारी सभागृहास आणि राज्यातील जनतेला मिळावी यासाठी सरकारने श्वेतपत्रीका काढावी अशी मागणी आमदार देशमुख यांनी केली. लातूर, सोलापूर व राज्यातील इतर विमानतळ सुरू करावीत वाढवण बंदर खासगी राहणार की सरकारी यावर बोलतांना म्हणाले, वाढवण बंदर प्रकल्पावर केंद्र व राज्य सरकार गुंतवणूक करणार आहे. सदर प्रकल्प पूर्ण झाल्यावर खाजगीकरण होणार की सरकारचाच राहणार हे सांगावे. राज्यात अनेक जिल्हयात विमानतळ विकासासाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे. परंतु लातूर, सोलापूर यासह अन्य काही ठिकाणची विमातळे रिलायन्सकडेच आहेत. या विमानतळाचे एमआयडीसीकडे हस्तातरण करून विकास करण्यात यावा. अर्थसंकल्पात कृषि विभागाकडे दुर्लक्ष कोवीड काळात आणि त्यानंतर उदयोगधंदे डबघाइस जात असतांना कृषी व्यवस्थेने राज्याला तारले अर्थव्यवस्थेला आधार दिला. मात्र याच कृषि क्षेत्राच्या समस्येसाठी कोणत्याही उपयायोजना दिसत नाहीत. ग्रामिण भागातून कृषिमाल शहराकडे आणतांना रस्त्यामुळे अडचणी येतात त्या अडचणी दूर होण्यासाठी शेतीमाल वाहतूक सुरळीत होण्यासाठी शेतीमाल वाहतूक रस्ते विकास कार्यक्रम राबवावा अशी मागणी त्यांनी केली. शेतीमालाला शाश्वत बाजारपेठ उपलब्ध करुन देण्याचे आश्वासनही पून्हा एकदा या अर्थसंकल्पात देण्यात आले आहे. शासनाने जाहीर केलेली आधारभुत किंमत आणि बाजारतील प्रत्यक्ष किंमत यात क्विंटलमागे १ हजार रुपयाचा फरक असल्याने शेतकरी मोठया अडचणीत आले आहेत. यासाठी राज्यातील शेतकऱ्यांसाठी भावत्तर योजना सुरू करावी असेही त्यांनी म्हटले. शेतकऱ्यांना विश्वासात घेतल्याशिवाय सरकारने शक्तीपीठ मार्गाचे काम सुरू करू नये नव्याने होत असलेला राज्यातील तिर्थक्षेत्रांना जोडणारा शक्तीपीठ महामार्गाला लातूर, धाराशिव, नांदेड, बीड येथील शेतकऱ्यांकडून विरोध होत आहे. इतर जिल्ह्याची तीच अवस्था आहे त्यामुळे शेतकऱ्यांना विश्वासात घेतल्याशिवाय सरकारने शक्तीपीठ महामार्ग करू नये अशी मागणी आमदार देशमुख यांनी केली. मराठवाडा वॉटरग्रीडची सुरूवात लातूर, बीड, धाराशीव या जिल्हयापासून होणे गरजेचे मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्पावर ३७ हजार ६६८ कोटी रु. खर्च केला जाणार आहे अनेक वर्षापासून मराठवाडा वॉटरग्रीडची चर्चा आहे मात्र प्रत्यक्षात कामाला सुरूवात होत नाही. मराठवाडयात सर्वच जिल्हयात पाणी प्रश्न गंभीर आहे. लातूर शहराला तर रेल्वेने पाणी पुरवठा करण्याची वेळी आली होती याची जाणवी शासनाने ठेवणे गरजेचे आहे. यामुळे मराठवाडा वॉटरग्रीडची सुरूवात लातूर, बीड, धाराशीव या जिल्हयापासून होणे गरजेचे आहे. या मराठवाडा वॉटर ग्रीड प्रकल्पाचे काम लवकरात लवकर सुरू व्हावे असे सांगीतले. देशात महाराष्ट्रातील विजेचे दर सर्वाधिक महाराष्ट्रात विजेचे दर जास्त आहेत किंबहूना हे तर देशात सर्वाधिक आहेत, यामुळे विजेचे दर शेतकरी व सर्वसामान्य ग्राहकांच्या हितासाठी कमी करणे आवश्यक आहे. पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत शहरी व ग्रामिण भागात घरासाठी मिळणारे अर्थसहाय वेगवेगळे आहे. ग्रामिण भागात निधी कमी मिळतो यासाठी शहरी व ग्रामिण भागासाठी समान निधी मिळावा. लातूरला बांबू लागवड केंद्र सुरू झाले पण यामध्ये म्हणावी तशी प्रगती नाही, यामध्ये सुधारणा व्हावी. आरटीई अंतर्गत शुल्क प्रतिपूर्तीची थकबाकी २४०० कोटी आरटीई कायद्यानुसार, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील मुलांना मोफत शिक्षण मिळण्याचा अधिकार आहे. शाळांना मिळणारी ही प्रतिपूर्ती वेळेवर मिळाली नाही तर त्याचा विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम होतो. राज्यातील विविध शैक्षणिक संस्थामध्ये आरटीई अंतर्गत शाळांना मिळणारी शुल्क प्रतिपूर्तीची २४०० कोटी रु. थकबाकी आहे हे पैसै सरकारने देणे गरजेचे आहे. तस ऊच्च शिक्षण घेणाऱ्या अभियांत्रीकी व वैदयकीय महाविदयातील विदयार्थ्यांना मिळणारी शिष्यवृत्ती देण्यात यावी.




लातूरला विकासनीधी दयावा लातूर जिल्हयाला अर्थसंकल्पामध्ये अल्प निधी मिळाला आहे. जिल्हयाच्या विकासासाठी निधीची आवश्यकता आहे. लातूर जिल्हयातील लातूर येथील जिल्हा न्यायालय विस्तारीत इमारत, उभारण्यात येत असलेले परमपूज्य भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ७० फुटी पुतळा व स्मारक, आदरणीय विलासराव देशमुख मार्ग, नाट्यगृह, शादीखाना, भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे पानगाव येथील चैत्य स्मारक, सुरत शहावली दर्गा परिसर विकास यासह अनेक विकास कामे निधी अभावी रखडलेली आहेत, त्यासाठी निधी उपलब्ध करून द्यावा अशी मागणी यावेळी केली. राज्यात महाविकास आघाडी विधानसभा निवडणूक हरली असली आम्ही हिम्मत हरलेलो नाही असे सांगून चिंगारी को हवा देने की आदत नही है हमे, हक की बात परआग लगाने का दम रखते है हम असा शेवटी शेर सादर करून त्यांनी आपल्या भाषणाला विराम दिला.

१ लाडक्या बहीणींना अपात्र ठरवून वगळू नये
२ दावोस गुंतवणुक बाबत श्वेतपत्रीका काढावी
३ लातूर, सोलापूर व राज्यातील इतर विमानतळ सुरू करावीत
४ अर्थसंकल्पात कृषि विभागाकडे दुर्लक्ष
५ शेतकऱ्यांना विश्वासात घेतल्याशिवाय शक्तीपीठ महामार्ग करू नये
६ मराठवाडा वॉटरग्रीडची सुरूवात लातूर, बीड, धाराशीव पासून करावी
७ देशात महाराष्ट्रातील विजेचे दर सर्वाधिक
८ आरटीई अंतर्गत शुल्क प्रतिपूर्तीची थकबाकी २४०० कोटी

## गुंठेवारीला १३ मार्च २०२५ ते १५ एप्रिल २०२५ पर्यंत मुदतवाढ

लातूर/प्रतिनिधी :- शहर महानगरपालिका हद्दीतील अनधिकृत व हस्तांतरित झालेले भूखंड विकास नियमाधीन करण्यासाठी प्रस्ताव दाखल करण्यास दि. १३ मार्च २०२५ ते १५ एप्रिल २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.संबंधितांनी याची दखल घेत असे प्रस्ताव दाखल करून घेत भूखंड नियमित करावेत,असे आवाहन मनपाच्या वतीने करण्यात आले आहे.

लातूर शहर महानगरपालिका हद्दीतील विकास नियमाकुल बाबत गुंठेवारी लागू करण्यात आली होती.त्यानुसार शहर हद्दीतील नागरिकांना आपले हस्तांतरित झालेले व अनधिकृत भूखंड नियमाधीन करण्याची संधी देण्यात आली होती. याची मुदत दि.३१/०७/२०२४ रोजी संपली होती.विहीत मुदतीत प्रस्ताव दाखल करणे अनेकांना शक्य झाले नाही.त्यामुळे शहरातील अनेक नागरिक गुंठेवारीचा लाभ घेण्यापासून वंचित राहिले होते. ही बाब लक्षात घेता मनपाने १३ मार्च २०२५ ते १५ एप्रिल २०२५ मुदत वाढ दिली आहे.

शासनाचे परिपत्रक क्र.अनबां-१०२०/४८०/प्र.क्र/७९/ २०००/भाग-२० दि.०५/०५/२००१ तसेच महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार दिनांक १२ मार्च २०२१ रोजी प्रसिध्द केलेल्या- महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे,श्रेणीवाढ व नियंत्रण )अधिनियम २००१ यांच्या ४ कलम ३ मधील पोट- कलम १ मध्येर १ जानेवारी २००१ रोजी या मजकुराऐवजी ३१ डिसेंबर २०२० च्या व गुंठेवारी अधिनियमातील कलम ४(१) या प्रमाणे ठराव क्र.२९२ दि.१२/०३/२०२५ नुसार गुंठेवारी चालु करण्यासाठी १३ मार्च २०२५ ते १५ एप्रिल २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

महानगरपालिका हद्दीतील महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे,श्रेणीवाढ व नियंत्रण ) सुधारीत अधिनियम २०२१ व तसेच लातूर शहर हद्दीतील सद्यस्थितीत मंजूर विकास योजना (सु+वा.क्षे.) प्रमाणे अनाधिकृत भूखंड / हस्तांतरित झालेले भुखंड व गुंठेवारी विकास नियमाधीन करण्याासाठी नागरिकांनी प्रस्ताव दाखल करून घेवून नियमीत करावेत असे आवाहन मनपाच्या वतीने करण्यात आले आहे.

## राज्य शासनाच्या विरोधात पत्रकारांचे निदर्शने




लातूर- सरकारने मीडिया मॉनिटरिंग खाजगी संस्थेकडे देण्याच्या निर्णया विरोधात महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई जिल्हा शाखा लातूरने महात्मा गांधी यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करत काळ्याफिती बांधून निदर्शने केली व यावेळी राज्य शासनाचा त्या निर्णयाच्या विरोधात घोषणाबाजी करत निषेध व्यक्त केला.

महाराष्ट्र सरकारने वृत्तवाहिन्या, वृत्तपत्रे आणि डिजिटल माध्यमांवरील बातम्यांचे संकलन व विश्लेषण करण्याचे काम खासगी संस्थेला देण्याचा निर्णय घेतला आहे.पत्रकारितेचा मुख्य हेतू जनतेपर्यंत सत्य व वस्तुनिष्ठ माहिती पोहोचवणे हा आहे मात्र, सरकारकडून या कामासाठी खासगी संस्था नेमण्याचा निर्णय घेतल्याने बातम्यांवर अप्रत्यक्ष सेन्सॉरशिप लादली जाण्याचा धोका आहे. हा निर्णय सरकारविरोधी मतप्रवाह दडपण्याचा आणि प्रसारमाध्यमांवर अंकुश ठेवण्याचा प्रयत्न असल्याचे दिसते, असे पत्रकार संघाचे प्रदेश उपाध्यक्ष तथा जिल्हाध्यक्ष अशोक देडे मत व्यक्त केले.

यावेळी महाराष्ट्र पत्रकार संघांचे प्रदेश उपाध्यक्ष अशोक देडे, जिल्हा सरचिटणीस अशोक हणवते, शहराध्यक्ष महादेव डोंबे, जिल्हा संघटक सुधाकर फुले, जिल्हा उपाध्यक्ष लिंबराज पन्हाळकर, पत्रकार नेताजी जाधव, शिवाजी कांबळे, इले.प्रमुख शेख खय्युम, हरून मोमीन,रेणापूर तालुकाध्यक्ष शरद राठोड, विकास कांबळे, अरुण कांबळे, सुनील गुडे आदी सर पत्रकार बांधव उपस्थित होते.

## मनपा जाहीर करणार थकबाकीदार मालमत्ताधारकांची नावे दि.२० मार्च पूर्वी कर भरणा करण्याचे आवाहन



लातूर/ प्रतिनिधी :- मनपाच्या कर संकलन व कर आकारणी विभागाच्या वतीने आर्थिक वर्षाच्या २०२४-२५ सुरुवाती पासूनच १००% मालमत्ता कर वसुली चे नियोजन राबविले जात आहे. वर्षाच्या सुरुवातीला चालू वर्षातील मालमत्ताधारकांसाठी सुटच्या विविध योजना लागू केलेले होत्या. त्या नंतर वारंवार शास्ती/व्याजामध्ये सुट लागू केलेली होती व धडक जप्ती मोहीम सुधा राबविण्यात येत आहे. वारंवार योजना, सुट लागू करूनही व आवाहन करूनही काही थकबाकीदार टॅक्स भरायला तयार नाहीत. तसेच मार्च महिना सुरु झाला तरी काही थकबाकीदार टॅक्स भरण्यास तयार नसल्याने जप्ती सोबतच टॅक्स भरणा न करणाऱ्या थकबाकीदार मालमत्ता धारक यांची नावे प्रसिद्ध करण्याचा निर्णय मनपा प्रशासनाने घेतला आहे. त्यानुसार २१ मार्च पासून थकबाकीदार मालमत्ता धारक यांची नावे मनपा वेबसाइट, वर्तमानपत्र व बॅनरद्वारे प्रसिद्ध केली जाणार आहेत. तरी पुन्हा एकदा थकबाकीदार मालमत्ता धारकाना यादवारे आव्हण करण्यात येते की, सध्या सुरू असलेले ५०% शास्ती माफी योजनेचा लाभ घेऊन आपला थकीत टॅक्स भरणा करावा व शहर विकासात हातभार लावून प्रशासनास सहकार्य करावे असे आवाहन मनपा आयुक्त तथा प्रशासक बाबासाहेब मनोहरे यांनी केले आहे

## जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाचे उद्या वार्षिक अधिवेशन; आ.अभिमन्यु पवार यांच्या हस्ते उद्घाटन

लातूर :- जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाचे ४० वे वार्षिक अधिवेशन,जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघ व नागाबुवा वाचनालय हेळंब,ता.देवणी यांच्या संयुक्त विद्यमाने,गुरुवार,दि.१३ मार्च २०२५ रोजी सरस्वती संगीत महाविद्यालयाच्य पाठीमागे,नंदादिप विद्यालय, कातळे नगर,लातूर आयोजित करण्यात आले असून,या अधिवेशनाचे उद्घाटन औसाचे आ.अभिमन्यु पवार यांच्या हस्ते सकाळी १०.३० वाजता होणार आहे,महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष डॉ.गजनान कोटेवार यांच्या अध्यक्षतेखाली होणार्या या उद्घाटन सत्राला,महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संचालनालयाचे प्र.संचालक अशोक गाडेकर व लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांची विशेष उपस्थिती राहणार आहे.

या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ विचारवंत डॉ.सोमनाथ रोडे, जिल्हा ग्रंथालय अधिकारी वंदना काटकर-देशमुख,विभागीय सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे,राज्य ग्रंथालयाचे कार्योपाध्यक्ष राम मेकले,माजी अध्यक्ष प्राचार्य डॉ.रामेश्वर पवार,राज्य ग्रंथालय संघाचे कार्याध्यक्ष गुलाबराव पाटील,मराठवाडा विभाग ग्रंथालय संघाचे अध्यक्ष खंडेराव सरनाईक, कार्याध्यक्ष प्रभाकर कापसे,बीड जिल्हा ग्रंथालयाचे अध्यक्ष सुधीर चाटे,लातूर जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाचे कार्याध्यक्ष डॉ.ब्रिजमोहन झंवर,हेळंबच्या सरपंच अयोध्या सिरसे, नागाबुवा मठ संस्थानचे अध्यक्ष विठ्ठलराव पाटील,खाडगावचे सरपंच नेताजी देशमुख, पाखरसांगवीचे सरपंच भिमाशंकर लखादिवे हे लाभणार आहेत. तत्पूर्वी साने गुरुजी विद्यालय ते नंदादीप विद्यालय,कातळे नगर दरम्यान ग्रंथ दिंडी निघणार आहे,त्याचे उद्घाटन दादाराव कराड वाचनालयाचे अध्यक्ष डॉ.हणुमंत कराड,माजी जिल्हा परिषद अध्यक्ष पंडितराव धुमाळ यांच्या हस्ते होणार आहे.

यावेळी कै.ऍड.त्र्यंबकदास झंवर काका आदर्श ग्रंथपाल कार्यकर्ता राज्यस्तरीय पुरस्कार कुंडलिक मोरे सोलापूर,कै.मारुती चिरके आदर्श ग्रंथपाल जिल्हास्तरीय पुरस्कार प्रकाश सोनकांबळे, पुरस्कार वितरण तसेच महाराष्ट्र शासनाचा ग्रंथमित्र पुरस्कार प्राप्त युवराज जाधव,ज्येष्ठ विधीज्ञ ऍड.,शशिकिरण पाटील यांचा आ.अभिमन्यु पवार यांच्या हस्ते होणार आहे.दुपारी २ ते ३ दरम्यान महाराष्ट्र विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५०चा कायदा व विश्वस्त बदल अर्ज आणि इतर माहिती मार्गदर्शनाचे सत्र लातूर विभागाचे धर्मादाय सहाआयुक्त आर.ए.सासणे यांच्या अध्यतेखाली होणार असून,यावेळी लातूर विभागाचे धर्मादाय उपायुक्त एस.व्ही.एच.कादरी यांचे मार्गदर्शन होणार आहे.

दुपारी ३ ते ५ या वेळात ग्रंथालयाच्या अडीअडचणी,ठराव वाचन,खुली चर्चा व समारोपाचे तिसरे सत्र होणार आहे. अध्यक्षपदी सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे हे राहणार असून, जिल्हा ग्रंथालय अधिकारी वंदना काटकर यांचे प्रमुख मार्गदर्शन होणार आहे, तर प्रमुख वक्ते जिल्हा ग्रंथालय निरीक्षक राजेंद्र कोरे, बीड जिल्हा ग्रंथालय संघाचे कोषाध्यक्ष पवन गिरवलकर हे राहणार आहेत.



तरी लातूर जिल्ह्यातील सार्वजनिक ग्रंथालय चालक,ग्रंथालय कर्मचारी,वाचक,साहित्यिक,ज्येष्ठ नागरिक, साहित्यप्रेमींनी या जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय वार्षिक अधिवेशनाला जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन,नागाबुवा वाचनालयाचे अध्यक्ष गुणवंतराव सावंत,उपाध्यक्ष नरसिंग महानोरे,कार्यवाह तथा साने गुरुजी शैक्षणिक संकुलाचे कार्यवाह कालिदास माने,सहसचिव शशिकांत शिंदे, कोषाध्यक्ष प्रभाकर लाटे,सदस्य सुरेश शिंदे,प्रकाश शिंदे,गणेश टेकाळे,ग्रंथपाल किरण शिंदे, लिपिक हिरकण सावंत,जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाचे सहकार्यवाह काशिनाथ बोडके,कोषाध्यक्ष राम मोतीपवळे, संचालक किरण बाबळसुरे, अशोक खोडवे, गुप्तलिंग स्वामी, जहांगीर सय्यद,नंदकुमार घोगरे, अनिल पाटील, श्रीधर स्वामी, संतोष करमले, काशिनाथ साहू, बाळकृष्ण होळीकर, तुकाराम सुगावकर, बालाजी सूर्यवंशी, गोकर्णा सुर्यवंशी, स्वीकृत सदस्य राजकुमार सोनी,नागनाथ बिरादार, रामचंद्र तिरुके,अमित म्हेत्रे,संयोजन समितीचे सुनील पाटील,जी.टी.माने,उषा आडे,प्राचार्य एस.एस. चव्हाण,प्राचार्य विवेक माने,मुख्याध्यापक आय.एच.शेख, मुख्याध्यापक एस.आर.राऊत, मुख्याध्यापक जी.डी. तेलंगे, प्राचार्या एस.आर.पूरी गिरी, मुख्याध्यापक पी.एच. केंद्रे, मुख्याध्यापक एस.एस.भोसले, मुख्याध्यापक बी.एन.सगरे, मुख्याध्यापक एम.एन. जाधव,मुख्याध्यापक एस.एन.जोशी, प्राचार्या रोहिणी आकनगिरे, मुख्याध्यापिका व्ही. व्ही.डोंगरे,लिपीक एस.टी.बिरादार,क.लिपिक सुरज निकम,पी.सी.पाटील,प्रा.सतीष हानेगावे,महादेव खिचडे यांनी केले आहे.

## संपादकीय....

# 'फळांचा राजा' वातावरणाच्या विळख्यात

अवकाळी पाऊस, तापमानातील चढउतार, अधूनमधून वेगाने वाहणार्या वार्यामुळे यंदा हापूस आंब्याचा मोहोर गळण्याचे प्रमाण वाढले. परिणामी, यंदाच्या हंगामात आंबा कमी प्रमाणात उपलब्ध होणार आहे. 'फळांचा राजा' हापूस आंब्याला कोकणातच नव्हे, तर संपूर्ण जगभरात मोठी मागणी आहे. यंदा हापूस आंब्याची आवक घटणार आहेच, तसेच स्थानिक बाजारपेठेतही आंबा उशिरा दाखल होणार आहे.

आंबा पीकवाढीच्या काळात किमान तापमान किमान २२ ते २५ अंश सेल्सिअस इतके असते, तर कमाल ३० ते ३२ अंश सेल्सिअस असते. यावर्षी नोव्हेंबरपर्यंत पाऊस झाल्याने बागायतदार चांगलेच अडचणीत सापडले आहेत. दरवर्षी ऑक्टोबरपासून फवारणी करावी लागते; मात्र यंदा पावसाळा लांबल्याने तसेच अवकाळीमुळे नोव्हेंबरनंतर फवारणीला सुरुवात झाली. अवकाळी पाऊस, तापमानातील चढउतारामुळे यंदा हापूस आंबा बाजारपेठेत उशिरा दाखल होणार आहे. नैसर्गिक संकटांचा सामना शेतकरी, बागायतदारांना नेहमीच करावा लागतो. यंदा मात्र आंबा आणि काजू पिकावर मोठे नैसर्गिक संकट कोसळले आहे. मार्चमध्ये स्थानिक बाजारपेठेत हापूस आंबा दाखल होतो; मात्र अद्यापही मोठ्या प्रमाणात हापूस दाखल झालेला नाही. अवेळी पडणार्या पावसामुळे तापमानात प्रचंड वाढ झाली आहे. मार्च महिन्यातच तापमान अगदी ३७ ते ३८ अंश सेल्सिअसवर पोहोचले आहे. यामुळे बर्याच ठिकाणी फळगळतीही झाली आहे. जानेवारीच्या सुरुवातीला मोहरसुद्धा मोठ्या प्रमाणात गळला होता. पावसामुळे फवारणी करण्यास उशीर झाल्याने आंबा पीक येण्यास अनियमितता आली आहे.

हापूस आंबा झाडांची योग्य काळजी घेताना खत घालणे, साफसफाई करणे आदी मोठे कष्ट करावे लागतात; मात्र यात आंबा पिकासाठी हवामान सर्वात महत्त्वाचा घटक आहे. आंब्याला पोषक हवामानाची गरज असते. यावर्षी तापमान चांगले वाढल्याने याचा फटका फळांना बसला. रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या तिन्ही जिल्ह्यांमध्ये फळगळती झाली. काही मोजक्याच बागायतदारांकडून काही पेट्या वाशी मार्केट आणि परदेशात पाठवण्यात आल्या आहेत; मात्र खर्याअर्थाने अद्यापही वाशी अथवा कोणत्याही जिल्ह्यातील हापूस आंब्याचे मार्केट गजबजले नाही. मार्चच्या अखेरपासून आंबा स्थानिक बाजारपेठेत दाखल होण्यास सुरुवात होईल. दिवसेंदिवस तापमानात वाढ होत आहे. याचे मुख्य कारण जंगलतोड, झाडांची कत्तल आहे. आपण एकीकडे देशातील दळणवळणाची व्यवस्था भक्कम करताना दुसरीकडे पर्यावरणाचा र्हासही होत आहे. मानवी विकास जलदगतीने होताना निसर्ग मात्र संकटात सापडत चालला आहे. ज्या गोष्टी नैसर्गिकरीत्या वाढत होत्या त्याला कृत्रिमतेची जोड मानवाकडून देण्यात आल्याने याचा वाईट परिणाम होत आहे. कोकणातील सर्वच आंबा बागायतदार सध्या चिंतेत आहेत; पण निसर्गापुढे आपण काही करू शकत नाही, हे तितकेच खरे आहे. गेल्या चार पाच वर्षांत चक्री, तोक्ते, फयान यासारखी वादळे आली. त्यानंतर गेल्या तीन वर्षांत अवेळी पडणारा पावासाने शेतकर्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे. यावर्षीच्या आंब्याची चव चाखण्यासाठी आणखी काही दिवस वाट बघावे लागणार आहे. २० ते ३० टक्क्यांनी उत्पादनात घटही असणार आहे. यंदा आंबा पीक उशिरा आल्याने तो प्रक्रियेसाठीसुद्धा कॅनिंग कंपन्यांमध्येही उशिरा दाखल होईल. कोकणातील अनेक महिला बचत गटसुद्धा हापूस आंब्यांची विक्री करून लाखोंची उलाढाल करत असतात. यावेळी त्यांनाही वाट पाहावी लागणार आहे. काजू उत्पादनातही घट : काजू पिकावरही मोठा परिणाम यावर्षी झाला आहे. ओल्या काजू गराची पहिल्या टप्प्यात विक्री सुरू असून, दरही १६०० ते २००० रुपये किलो आहेत. आंब्याप्रमाणेच काजूलाही उशिरा मोहर आला. फवारणी नोव्हेंबरमध्ये करण्यात आली. त्यामुळे त्याला पालवीसुद्धा उशिरा आली. त्यात अवेळी पावसामुळे फूलकीड लागल्याने काजू उत्पादनातही यावेळी घट झाली आहे.

# निवडून आले, की अनभिषिक्त राजे?

मी कॉमन मॅन बोलतोय. आर के लक्ष्मण यांचा कॉमन मॅन. तुम्ही विसरला असाल कदाचित. म्हणजे आजच्या पिढीला माहितीदेखील नसेल कोण आर के लक्ष्मण, कोण कॉमन मॅन! अनेक वर्षापूर्वी सकाळी उठून त्याचेच दर्शन व्हायचे टाइम्सच्या पहिल्या पानावर. चेक्सचा कोट घातलेला, काहीसा गबाळा दिसणारा, भांबावलेला, गरीब, तुमच्या आमच्यातला, वरपांगी बावळट वाटणारा, पण अवतीभवतीच्या घटनांवर,राजकारणावर कमीत कमी शब्दांत तिखट भाष्य करणारा कॉमन मॅन. आज तो असता तर तुटून पडला असता या राजकारणी पुढार्यांवर, स्वतःला समाजसेवक म्हणविणाऱ्या ढोंगी, भ्रष्टाचारी नेत्यावर! आता आर के लक्ष्मण नाहीत, त्यांचा कॉमन मॅन नाही पण कुणीतरी ते काम करण्याची गरज आहे. सरकारच्या डोळ्यांत अंजन घालण्याची, त्यांना त्यांची जागा दाखवून देण्याची खरेच गरज आहे. स्वातंत्र्यानंतर कधी नव्हे ते राजकारण चिखलाने अक्षरशा बरबटले आहे. अतिशय खालच्या स्तराला गेले आहे. निष्ठा, नैतिकता या शब्दांची लक्तरे करून टाकली आहेत या मंडळींनी. चारित्र्यवान पुढारी दिवा घेऊन शोधावे लागतील, अशी परिस्थिती आहे. मेजॉरीटी ने आलेली लोकशाही, म्हणजे हवे तसे वागण्याचे, बोलण्याचे, वाटेल ते करण्याचे स्वातंत्र्य असा अर्थ घेतला आहे या ढोंगी राजकारणी मंडळींनी! पक्ष कुठलाही असो, सगळेच एका माळेचे मणी. कोण कुणाशी, का युती करतो, कोण कुणाचा हात धरतो, कुणाचा सोडतो, कुठल्या पक्षातून निवडून येतो, मग कुठल्या पक्षात जातो याचा काहीच भरवसा राहिला नाही. आपण यांना कुठल्या अपेक्षेने, विश्वासाने निवडून दिले, का निवडून दिले त्याच्याशी म्हणजे मतदारांशी यांचे आता काही देणे घेणे उरले नाही. एकदा का हे निवडून आले की मग ते अनभिषिक्त राजे झाले. मग ज्यांनी निवडून दिले ती जनता गेली चुलीत! आमच्यासारखे कॉमन मॅन गेले खड्ड्यात! आपण म्हणजे त्यांच्यासाठी किस झाडकी पत्ती! सत्तेवर आलेत की यांच्यासाठी भ्रष्टाचाराचे, अत्याचारांचे, रान मोकळे! आम्हाला यांच्या राजकारणाचा नेमका अर्थच कळेनासा झाला आहे. यांची युती, यांची आघाडी, यांचे एकत्र येणे, हातात हात घालून ते वर करीत एकतेची ग्वाही देणे, मग एकमेकांवर चिखलफेक करणे, हे राजकारणाचे सोयीचे गणित आमच्या समजुती पलीकडचे आहे. यांच्यापैकी काही तर उच्च शिक्षित आहेत. मोठमोठ्या संस्थेतले हुशार म्हणविणारे उच्च शिक्षित, सुसंस्कृत पदवीधर. त्यांना भ्रष्टाचार घालवायचा होता. साफसफाई करायचा वसा घेऊन ते राजकारणात आले. स्वतःला निष्कलंक, स्वच्छ, निःस्वार्थी म्हणविणारे हेच महालाची स्वप्ने बघायला लागले. सत्ता भोगू लागले. चक्क तुरुंगातून सत्ता चालवू लागले. आपले नियम, कायदा, संविधानाच्या सवलती कशाही वाकवून, त्यांचे सोयीचे अर्थ लावून ही मंडळी न्यायालयाच्यादेखील डोळ्यांत धूळफेक करीत आपला मुद्दा रेटून धरतात. त्यामुळे खरे, खोटे काय, न्याय अन्याय काय, चांगले वाईट काय याचे अर्थही बदलत चालले आहेत. हे काय गौडबंगाल आहे ते आमच्या सारख्या कॉमन मॅनला कळेनासे झाले आहे. किती मोठा विरोधाभास आहे हा. आमच्यासाठी कायदे करणारी मंडळी स्वतःच कायदे पायदळी तुडवत आहेत. गुन्हेगारांना संरक्षण देत आहेत. त्यात भागीदार आहेत. अन् वर स्वच्छ पारदर्शी प्रशासन, लोकांच्या भल्यासाठी निर्णय घेणारे शासन, अशा घोषणा देत आहेत! ही संविधानाचीच प्रतारणा आहे. ज्यांनी यांना निवडून दिले, सत्तेत पाठवले त्या जनतेशी विश्वासघात आहे. ही एक प्रकारे लोकशाहीची विटंबना आहे. हे असे एकाएकी कसे बिघडले, रसातळाला गेले हेदेखील न उलगडणारे कोडेच आहे कॉमन मॅनसाठी. कुणालाही कायद्याची भीती राहिलेली नाही. अगदी तुरुंगात महिनोन महिने राहून आलेलेदेखील उजळ माथ्याने समाजात वावरताना दिसतात. सत्ता भोगताना दिसतात. अन् कॉमन मॅनसाठी मात्र नियम वेगळे. साध्या गुन्ह्याखालीदेखील त्याला तुरुंगात खितपत पडावे लागते. कोर्टाच्या पायऱ्या झिजवाव्या लागतात. साधा अपराध असला तरी त्याच्या नोकरीवर टाच येते. निलंबन होते. म्हणजे या पुढाऱ्यासाठी नियम वेगळे. कॉमन मॅनसाठी वेगळे. न्याय वेगळा. आता राजकारणाचे प्रचंड गुन्हेगारीकरण झाले आहे. ही मंडळी तरुण पिढीला नादी लावतात. त्यांना स्वतःच्या स्वार्थासाठी गुन्हेगारीसाठी प्रवृत्त करतात. न शिकता, कष्ट न करता पैसा हाती खेळत असेल, मौज मजा करायला मिळत असेल तर ते कुणाला नको आहे? अन् त्यातही मोठ्या वडाच्या सावलीत आरामात ऐश करायला मिळत असेल, थोडीफार प्रसिद्धी मिळत असेल तर कुणाला नको आहे? आजची तरुण पिढी म्हणूनच या मृगजळामागे मोर्चात, आंदोलनात फरफटत वाहवत जाताना दिसते. कोवळ्या वयात गुन्हेगारी जगात आपले आयुष्य, भविष्य बरबाद करताना दिसते. कसलाही कामधंदा, उद्योग, व्यवसाय न करणाऱ्या या मंडळीकडे आलिशान गाड्या, हातात गळ्यात सोन्याचे दागिने येतात कुठून? हे प्रश्न आहेत आमच्या सारख्या कॉमन मॅनचे. कशासाठी निवडून देतो आम्ही यांना? कशासाठी होतात कोट्यवधी रुपये खर्च करून होणाऱ्या निवडणुका? कशासाठी सर्व सामान्य जनता खर्च करते, कर भरते या सत्ताधाऱ्यांसाठी? आहे कुणाकडे उत्तर, स्पष्टीकरण? कुठे चालला आहे

हा सुजलाम सुफलाम म्हणवणारा देश, प्रदेश? कोण करेल कॉमन मॅनचे शंका समाधान? केवळ तांत्रिक प्रगतीचा देखावा, वरवर दिसणाऱ्या सुखसोयी याला समृद्धीचा महामार्ग म्हणत नाही. जोपर्यंत देशाचा प्रत्येक नागरिक, कॉमन मॅन, स्वच्छ, प्रामाणिक, चारित्र्य संपन्न होणार नाही तोपर्यंत भारत भाग्य विधाता, विश्वगुरू होऊ शकणार नाही.

# धूम्रपान,मद्यपानच्या जाहिराती आयपीएलमध्ये नकोत याचे स्वागतच,परंतु इतरत्रही नकोच!

आयपीएल सामन्यांदरम्यान मैदानाच्या परिसरात आणि दूरचित्रवाणीवरील प्रसारणामध्ये तंबाखूजन्य पदार्थ आणि मद्याच्या प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष जाहिराती करू नयेत अशी विनंती केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने केली आहे.यात त्यांनी म्हटले आहे की, सार्वजनिक आरोग्याचा विचार करणे ही नैतिक जबाबदारी आहे.माझ्यामते आरोग्य मंत्रालयाने आयपीएलला विनंती करण्यापेक्षा आदेश दिला असता तर बरे झाले असते. तंबाखूजन्य पदार्थ, धूम्रपान आणि मद्यपान घातक आहे ही बाब जगजाहीर आहे व याची माहिती आरोग्य मंत्रालय व सरकारला सुध्दा आहे.मग सरकार अशा घातक पदार्थांच्या उत्पादनावरच बंदी का घालत नाही? असे जर झाले तर जाहिरातही होणार व कोणी धूम्रपान व मद्यपान सुध्दा करणार नाही.हा सर्वात महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होतो.सरकार धूम्रपान, मद्यपानच्या जाहिराती बद्दल फक्त आयपीएल पुरते सिमित राहुन चालणार नाही तर सार्वजनिक ठिकाणे, शाळा - महाविद्यालय परिसर, सोशल मीडिया, इलेक्ट्रॉनिक मीडिया, डिजिटल मीडिया किंवा इतर प्रसार माध्यमांद्वारे धूम्रपान, मद्यपानच्या जाहिराती होणार नाही याचीही जबाबदारी सरकारने घेतली पाहिजे.कारण धुम्रपान मानवजातीसाठी अत्यंत घातक आहे.भारतात हृदयरोग, कर्करोग, फुफ्फुसांचे आजार, मधुमेह, उच्चरक्तदाब आदींमुळे दरवर्षी ७० टक्क्यांहून अधिक मृत्यू होतात.तंबाखू आणि मद्याचे सेवन हे असंसर्गजन्य आजारांच्या प्रमुख कारणांपैकी एक आहे. जगभरात तंबाखूमुळे होणाऱ्या मृत्यूंमध्ये भारत दुसऱ्या क्रमांकावर असून दरवर्षी सुमारे १४ लाख नागरिक जीव गमावतात,तर मानसिक चिंतेवर पर्याय म्हणून भारतात मद्याचे सेवन होते.शेवटी कोणतीही नशा असो ती घातकच असते. आयपीएल ही भारतात सर्वाधिक पाहिली जाणारी क्रीडा स्पर्धा असल्याने कोणत्याही व्यासपीठावर तंबाखू, मद्याचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष प्रसार होणे हे आरोग्य आणि तंदुरुस्तीबद्दल परस्पर विरोधी संदेश देणारे आहेत असे पत्रात आरोग्य मंत्रालयाने अधोरेखित केले आहे.आरोग्य मंत्रालयाने फक्त आयपीएलला गृहित धरून चालता येणार नाही तर देशातील इतरही छोट्या-मोठ्या खेळांच्या बाबतीत व सार्वजनिक ठिकाणांच्या बाबतीत तंबाखू, मद्याचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष प्रसार(जाहिरात) होणार नाही याचीही काळजी घेतली पाहिजे तेव्हाच धूम्रपान, मद्यपानाच्या जाहिरातीवर नियंत्रण ठेवता येईल व आरोग्य सुदृढ रहाण्यास मोठी मदत होईल.केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने धूम्रपान, मद्यपान किंवा इतरत्र नशेली वस्तूंच्या बाबतीत कोणालाही विनंती करण्याची गरज नाही. सरळ आदेश देऊन अशा घातक जाहिरातींवर ताबडतोब बंदी घालावी व कोणी नशेली वस्तूंची जाहिरात करीत असेल त्यांच्यावर कठोर कारवाई करून योग्य ती शिक्षा द्यावी. तेंव्हाच अशा घातक जाहिरातींवर आळा बसेल.

********


लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
(स्वतंत्र पत्रकार)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# बंधुभाव व एकतेचे प्रतीक - होळी

प्राचीन भारतात होळी हा रंग, प्रेम आणि वसंत ऋतूचा सण म्हणून साजरा केला जाणारा लोकप्रिय आणि महत्त्वाचा हिंदू सण आहे. वसंत ऋतुच्या आगमनाप्रसंगी निसर्गाने अधिकच साजश्रृंगार केलेला असतो. फुललेल्या फुलाला कोमलतेचा बहार आलेला असतो. झाडं पाना-फुलांनी नववधुगत बावरुन गेलेली असतात आणि पक्षाचं आकाशात झुलायचं स्वप्नही साकार झालेलं असतं. निसर्गाच्या तारुण्याचे हिरवेपण पाहून माणसाचं मन बहरुन आनंदून आलेलं असतं. वसंतोत्सव हा कालांतराने होळी दहनाच्या रुपाने साजरा होऊ लागला. उत्सवाचं स्वरुप जरी बदललं तरी उद्देश धोरण तोच आहे. प्रसन्नता, आनंद, मस्ती या दिवसात मन उचंबळून आलेलं असतं. लहान मुलांना पीडा देणाऱ्या 'होलिका', 'ढुंढा', 'पुतना' ह्यांसारख्या राक्षसींच्या दहनांच्या कथांमधे ह्या उत्सवाच्या परंपरेचा शोध काही लोक घेतात. एका पौराणिक कथेनुसार भगवान विष्णूचा भक्त असलेल्या प्रल्हादाला मारण्यासाठी हिरण्यकश्यपूने धाडलेल्या होलिकादेवतेचा श्रीविष्णू देवाने वध केला होता. होलिकेला वर होता की तिला अग्नी जाळू शकणार नाही, परंतु प्रल्हादाला जाळण्यासाठी तिने त्याला मांडीवर घेऊन अग्निकुंडात प्रवेश केला. प्रल्हाद बचावला व होलिकेचे दहन झाले अशी आख्यायिका प्रचलित आहे. अशाप्रकारे हिंदूंच्या इतर सणाप्रमाणे होलिका दहन देखील वाईटावर चांगल्याचा विजयाचे चांगले प्रतीक आहे. कारण तो हिरण्यकश्यपूवर नरसिंहाच्या रूपात विष्णूच्या विजयाचे स्मरण करतो. वाईट गोष्टींवर विजय मिळवणे ही या सणाची व्याख्या आहे. या प्रकारे होळीची उत्पत्ती झाली आणि ती प्रामुख्याने भारतीय उपखंडात साजरी केली जाते.

होळी भारतात वसंत ऋतूचे आगमन, हिवाळ्याचा शेवट आणि प्रेमाचा बहर साजरी करते. हे वसंत ऋतु कापणीच्या चांगल्या हंगामासाठी देखील एक आवाहन आहे. हे एक रात्र आणि एक दिवस चालते, हिंदू पंचांग फाल्गुन महिन्याच्या पौर्णिमेच्या संध्याकाळी (पौर्णिमेचा दिवस) चालू होतो, जो इंग्रजीब ग्रेगोरियन कॅलेंडरमध्ये मार्चच्या मध्यभागी येतो. फाल्गुन पौर्णिमेच्या दिवशी येणारा होळी हा सण लोक आनंदाने साजरा करतात. या उत्सवाला 'होलिकादहन' किंवा 'होळी पौर्णिमा', 'शिमगा', 'हुताशनी महोत्सव', फाग, फागुन 'दोलायात्रा', 'कामदहन' अशा वेगवेगळ्या संज्ञा आहेत, ज्याला कोकणात शिमगो म्हणतात. फाल्गुन महिन्याच्या शेवटच्या दिवशी साजरा होणाऱ्या ह्या लोकोत्सवाला 'फाल्गुनोत्सव' आणि दुसऱ्या दिवशी सुरू होणाऱ्या वसंत ऋतूच्या आगमनानिमित्त 'वसंतागमनोत्सव' किंवा 'वसंतोत्सव' असेही म्हणण्यात येते. देशीनाममाला या ग्रंथात हेमचंद्र याने या सणाला सुग्रीष्मक असे नाव दिले आहे. यातूनच 'शिमगा' असा अपभ्रंश तयार झाला असावा असे मानले जाते.

भारताचा सांस्कृतिक सण म्हणजे होळी ! अंतःकरणातील अपार प्रेमाने रंग गुलालाची उधळण करणारा. रंगोन्मादानं भारतीय मातीत अंर्तबाहय मस्ती भरणारा. प्रांत, भाषा व धर्माच्या विभिन्न रंगांच्या सरितांना राष्ट्रीय रंगस्थळीच्या त्रिवेणीत एकात्मतेच्या रंगानं प्रवाहित करणारा हा राष्ट्रीय सण. होळी-धुळीवंदन सणाला महाराष्ट्रात धामधुम, युवकांचा जल्लोष, मादक द्रव्यांचा सर्रास वापर व आहारी जात या सणाची सणसण समाजात पसरवितांना दिसतात. होळीच्या दिवशी राजा आणि प्रजा एक होऊन एकमेकांवर रंग उडवितात ते काय निदान वर्षाचे चार-पाच दिवस तरी समानतेचे तत्व अनुभवण्यासाठी? मानवी आरोग्यावर होणारे ऋतुचे परिणाम याचा संकेत देणारा सण आहे, निसर्ग आनंदाचा सण आहे. होळीमध्ये एकमेकांना विविध रंग लावून हा सण साजरा करतात. तसेच विविध पारंपरिक गाणी, पारंपरिक नृत्ये यामध्ये समाविष्ट असतात. बंजारा समाजामध्ये होळीला फार महत्त्व आहे. बंजारा समाजामध्ये, बंजारा भगिनी पारंपरिक पोशाखात नृत्य करतात. विशेषतः उत्तर भारतामध्ये उत्साहाने साजरा होणारा एक सण आहे. याला वेगवेगळ्या प्रदेशात वेगवेगळ्या नावाने संबोधले जाते.



भारताच्या निरनिराळ्या राज्यात निरनिराळ्या प्रकारे होळी करतांना दिसतात. परंतू होळी पेटविण्याचा प्रकार सर्वच ठिकाणी सारखाच होत असतो. महाराष्ट्रात शेणाच्या गोवऱ्यांची किंवा लाकडांची होळी करण्याची प्रथा आहे. कोकणपट्टीत सुपारीचे झाड, आंब्याचे किंवा इतर कुठल्याही झाडांचा सोट देवळापूढे रोवून त्यांच्या तळाशी लहान-लहान लाकडे व गवत जाळतात. इतर प्रदेशाच्या मानाने महाराष्ट्रातील कोकणपट्टीत या सणाला बरेच महत्व आहे. गोव्यात काही ठिकाणी वायंगणी शिमगा म्हणजे चैत्र शुक्ल पक्षात देखील घुमट (मडक्याचे वाद्य) वाजविले जावून जल्लोशात होळी सण साजरा करतांना आढळतात. होळी हा रंगाचा आणि कृषी संस्कृतीचे जतन करणारा सण आहे. शेतकरी वर्गात होळी या सणाचे खास महत्त्व आहे. पौराणिक इतिहास पाहता या सणाचे आणि कृष्ण-बलराम यांचे नाते दिसून येते. होळीच्या निमित्ताने या दोन्ही देवतांचे स्मरण आणि पूजा करतात. यादिवशी हाती आलेल्या पिकाबद्दल देवाला धन्यवाद देण्यासाठी प्रार्थना करतात. होळीच्या दुसऱ्या दिवशी गव्हांच्या ओंब्या भाजण्याची प्रथा आहे. या दिवसात गव्हाचे पीक तयार होते हे त्यामागील कारण असू शकते. नवीन पीक अग्नी देवतेला समर्पित करण्याचीही प्रथा आहे. आदिवासी जमातीतील स्त्री-पुरुष हा दिवस गुलाल उधळून, टिमक्या-ढोल वाजवून, नृत्य करून उत्साहाने साजरा करतात. महाराष्ट्रातील आदिवासी जमातीतील लोकांत होळी हा सण उत्साहाने साजरा केला जातो. होळी साजरा करत असतांना आदिवासी लोकांच्या भोजनामध्ये गोड पुरी, मासळी व गोड भात या पदार्थांचा समावेश असतो. सातपुडा पर्वत प्रदेशातील आदिवासी होळीच्या दरम्यान काठी उत्सव साजरा करतात. बाराव्या शतकापासून ही परंपरा सुरू असल्याचे दिसते. दागदागिने घालून, नक्षीकाम करून स्त्री-पुरुष यात सहभागी होऊन विविध वाद्यांच्या तालावर नृत्य करतात.

महाराष्ट्रात होळीच्या दिवशी समिधा म्हणून काही लाकडे मंत्रोच्चारात जाळतात येतात आणि पेटलेल्या होळीभोवती 'बोंबा' मारत लोक प्रदक्षिणा घालतात. होळीला नारळ अर्पण करून नैवेद्य दाखवतात. महाराष्ट्रात पुरणपोळीचा नैवेद्य दाखविण्याची रीत आहे. होळीच्या दुसऱ्या दिवशी धूलिवंदनाचा सण साजरा केला जातो. याला 'धुळवड' असेही म्हणतात. या दिवशी होळीची रक्षा अंगाला फासली जाते किंवा ओल्या मातीत लोळण घेतली जाते. होळीनंतर ५ दिवसांनी रंगपंचमी हा सण साजरा केला जातो. एकमेकांना गुलाल लावून रंगांची उधळण करणे, सर्वांनी एकत्र येणे, बंधुभाव आणि एकतेचे प्रतीक म्हणून याकडे पहिले जाते. होळी हा रंगाचा सण आहे, समस्त समुदाय होळीची विधियुक्त पूजा करतो. होळी समोर गाऱ्हाणे, नवस बोलण्याची परंपरा आहे. नागपूरकर भोसल्यांच्या वाड्यात व तसेच पेशवाईत खेळली जाणारी होळी आणि रंगपंचमी तर महाराष्ट्राच्या इतिहासात सुप्रसिध्दच आहे. स्वतंत्र भारतात होळीची प्रथा पंडित जवाहरलाल नेहरुंजी पण जोपासली, जपली ! प्रेम आणि आनंद पसरवणे आपण या सणाचा स्वीकार करत असताना, याज्ञ मनः पूर्वक शुभेच्छांसह प्रेम आणि आनंद पसरवू या. या प्रसंगी सर्वांना सुरक्षित होळी आणि धुलीवंदनाच्या हार्दिक शुभेच्छा !

*******

प्रविण बागडे
नागपूर
भ्रमणध्वनी : ९९२३६२०९१९

# होळीसाठी बनवा खास मसालेदार बटाटा सारणासह डाळ कचोरी, स्पेशल मेन्यू

'होळी रे होळी पुरणाची पोळी' हे तर परंपरागत आपण कायम ऐकत आलो आहोत आणि नेहमची परंपरेनुसार होळीच्या दिवशी पुरणाच्या पोळीची मजा घेत आलोय. पण होळीच्या या सणासाठी अनेक पदार्थ आपल्या भारतात बनवले जातात आणि उत्तरेकडे कचोरी खाणे हादेखील एक पर्याय होळीच्या दिवशी निवडला जातो. आपल्याला कचोरी म्हणजे स्वीट्स मार्टमधून विकत आणून खाणे हाच एक पर्याय माहीत आहे. मात्र यावर्षी तुम्ही होळीच्या दिवशी घरच्या घरीही कचोरी तयार करून आपल्या घरच्यांना सुखद धक्का देऊ शकता. होळीच्या दिवशी तुम्ही मूगडाळीची कचोरी बटाट्याच्या सारणासह बनवा आणि सर्वांची वाहवा मिळवा. यासाठी शेफ दीपक गोरे, इन हाऊस कलिनरी शेफ, टाटा संपन्न, टाटा कंझ्युमर प्रॉडक्ट लिमिटेड यांनी साहित्य आणि विधी दिला आहे. मग वाट कसली पाहताय लागा लगेच तयारीला आणि करा साहित्याची ऑर्डर साहित्य कचोरीसाठी पीठ: मैदा – २ कप ऑरगॅनिक इंडिया तूप – ४ टेबलस्पून टाटा मीठ – ट टीस्पून पाणी – ठ कप प्रयागराजची प्रसिद्ध खस्ता कचोरी आता घरीच बनवा, संध्याकाळचा नाश्ता होईल आणखीनच खास सारणासाठी: टाटा संपन्न मूग डाळ (तुरीट) – २५ ग्रॅम टाटा संपन्न उडीद डाळ – २५ ग्रॅम डाळ भिजवण्यासाठी – आवश्यकतेनुसार पाणी ऑरगॅनिक इंडिया तूप – ४ टेबलस्पून टाटा संपन्न बडीशेप – १ टीस्पून टाटा संपन्न जिरे – १ टीस्पून टाटा संपन्न





धणे – १ ट टेबलस्पून टाटा संपन्न हिंग – ञ टीस्पून टाटा संपन्न हळद – ञ टीस्पून टाटा संपन्न काश्मीरी लाल तिखट – २ ट टीस्पून टाटा संपन्न धणे पावडर – १ टेबलस्पून टाटा संपन्न गरम मसाला – १ टीस्पून टाटा संपन्न चाट मसाला – १ टेबलस्पून मीठ – चवीनुसार टाटा संपन्न बारीक बेसन – ञ कप बारीक चिरलेली हिरवी मिरची – २ लहान उकडून सोललेला आणि मॅश केलेला बटाटा – २ मध्यम आकाराचे

संध्याकाळच्या नाश्त्याला बनवा बटाटयाची खुसखुशीत कचोरी, झटपट रेसिपी नोट करा कशी आहे कृती कचोरीसाठी सारण: एका भांड्यात मूंग डाळ आणि उडीद डाळ २ तास भिजत ठेवा. पाणी काढून मिक्सरमध्ये भरडसर वाटून घ्या आणि बाजूला ठेवा कढईत ऑरगॅनिक इंडिया तूप गरम करून त्यात बडीशेप, जिरे, धणे आणि हिंग घालून मंद आचेवर परतून सुगंध येऊ द्या हळद, लाल तिखट, धणे पावडर, गरम मसाला, चाट मसाला आणि मीठ घालून मंद आचेवर परता त्यात बेसन टाकून मंद आचेवर भाजा जोपर्यंत बेसनला छान सुगंध येत नाही आता वाटलेली डाळ आणि मॅश केलेला बटाटा घालून नीट मिक्स करून ५ मिनिटे शिजवा. मिश्रण पूर्ण थंड होऊ द्या कचोरीसाठी पीठ: एका मोठ्या भांड्यात मैदा, मीठ घालून व्यवस्थित मिक्स करा. त्यात तूप टाकून चांगले चोळून घ्या, जेणेकरून पीठ ओलसर वाटेल पाणी घालून मऊ आणि नरम पीठ मळून घ्या पीठाला तेलाचा हलका हात लावून ३० मिनिटे झाकून ठेवा कचोरी भरणे आणि तळणे : पीठाचा लहान गोळा घेऊन हाताने मळून घ्या आणि हलक्या हाताने लाटून घ्या त्यात तयार केलेले मसालेदार बटाटा-डाळ सारण ठेवा. पीठाची कड बाजूने गोळा करून नीट बंद करा आणि हलक्या हाताने लाटून घ्या तेल गरम करून मंद आचेवर कचोरी तळायला ठेवा. कचोरी आपोआप वर यायला ३ मिनिटे लागतात, तोपर्यंत हलवू नका नंतर हलक्या हाताने उलटा-पलटी करून दोन्ही बाजूंनी सोनेरी आणि कुरकुरीत होईपर्यंत तळा कचोरी टिश्यू पेपरवर काढून अतिरिक्त तेल निघू द्या मूगडाळ कचोरी तयार! चिंचेच्या चटणी, गोड दही, तिखट पुदिना चटणी आणि शेव सोबत सर्व्ह करा होळीसाठी काय करायचं हे कळत नसेल तर हा लेख नक्कीच तुमची मदत करेल.

## दातांवर साचून राहिलेला पिवळा थर कमी करण्यासाठी करून पहा 'हे' घरगुती उपाय, अंधारातही चमकतील पांढरे शुभ्र दात

दातांच्या निरोगी आरोग्यासाठी प्रत्येक व्यक्ती सतत काहींना काही करत असते. प्रत्येक व्यक्तीचे हास्य हे त्याचे व्यक्तिमत्त्वाचा दर्शवते. चारचौघांमध्ये आकर्षक आणि सुंदर दिसण्यासाठी दात देखील स्वच्छ असणे आवश्यक आहे. मात्र अनेकदा दातांवर साचून राहिलेल्या पिवळेपणामुळे महिलांसह पुरुषांचा आत्मविश्वास देखील कमी होऊन जातो. दातांची योग्य पद्धतीने काळजी न घेणे, दातांवर साचून राहिलेला पिवळा थर, तोंडातील दुर्गंधी, अस्वच्छ हिरड्या., किडलेले दात इत्यादी अनेक समस्या उद्भवू लागल्यानंतर अनेक लोक दुर्लक्ष करतात. मात्र असे केल्यामुळे दातांसंबंधित अनेक समस्या उद्भवू लागतात. खाण्यापिण्याच्या चुकीच्या सवयी, आहारात सतत होणारे बदल, दारू, तंबाखू, सिगारेट इत्यादी पदार्थांच्या अतिसेवनामुळे दातांचे आरोग्य पूर्णपणे खराब होऊन जाते. चारचौघांमध्ये हसताना किंवा बोलताना तोंडातून येणाऱ्या घाण वासामुळे हसताना किंवा बोलताना लाजिरवण्यासारखे वाटू लागते. अशावेळी अनेक लोक डॉक्टरांच्या सल्ल्याने वेगवेगळ्या ट्रीटमेंट करून घेतात. मात्र फारकाळ या ट्रीटमेंटचा प्रभाव दातांवर टिकून राहत नाही. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला दातांवरील पिवळा थर आणि दात स्वच्छ करण्यासाठी काही घरगुती उपाय सांगणार आहोत. हे घरगुती उपाय केल्यास दातांवर साचून राहिलेला पिवळेपणा कमी होऊन दात चमकदार आणि सुंदर दिसतील. स्ट्रॉबेरी आणि पांढर मीठ: चवीला आंबट गोड असलेली स्ट्रॉबेरी दातांवरील पिवळा थर कमी करण्यासाठी अतिशय प्रभावी आहे. यामुळे दात स्वच्छ होतात आणि चमकदार दिसतात. यासाठी स्ट्रॉबेरीचे दोन तुकडे करून एक तुकड्यावर पांढरे मीठ घेऊन दातांवर हलक्या हाताने चोळा. याशिवाय स्ट्रॉबेरीची पेस्ट तयार करून त्यात मीठ मिक्स करून दातांवर लावू शकता. त्यानंतर दात ब्रशच्या साहाय्याने घासून घ्या. हा उपाय नियमित केल्यास दातांवर साचून राहिलेला पिवळेपणा कमी होईल आणि दात स्वच्छ दिसतील. सफरचंद सायडर व्हिनेगर: दातांसंबंधित समस्यांपासून आराम मिळवण्यासाठी सफरचंद सायडर व्हिनेगरचा वापर करावा. यामुळे तोंडातील दुर्गंधी कमी होईल आणि दात स्वच्छ दिसतील. सफरचंद सायडर व्हिनेगर दातांसाठी नैसर्गिक पांढरे करणारे एजंट म्हणून काम करते. याशिवाय या पदार्थाचा आवश्यकतेप्रमाणे वापर करावा. जास्त प्रमाणात वापरू नये.

## डायबिटीसचा सर्वात स्वस्त उपाय सापडला, १० रूपयांच्या भाजीचा कुटून काढा रस, ५०% होईल शुगर कमी





मधुमेहाचा आजार जगभर एका साथीच्या आजारासारखा पसरत आहे. भारतात, १० कोटींहून अधिक लोक मधुमेहाचे रुग्ण आढळून आले आहेत, तर १५ कोटी लोक मधुमेहाच्या उंबरठ्यावर आहेत आणि त्यांना प्रीडायबिटीजचा त्रास आहे. येत्या काही दशकांमध्ये हीच परिस्थिती अधिक गंभीर होऊ शकते.

मधुमेह हा असाध्य आजार मानला जातो कारण तो उपचारांनी कायमचा बरा होऊ शकत नाही. तथापि, औषध, इन्सुलिन आणि निरोगी आहाराने हा आजार नियंत्रित केला जाऊ शकतो. मधुमेहाच्या रुग्णांना त्यांच्या साखरेची पातळी नियंत्रित करण्यासाठी आयुष्यभर औषधे किंवा इन्सुलिन घ्यावे लागते. आयुर्वेदिक डॉक्टर माधव भागवत यांनी याबाबत अधिक माहिती दिली आहे. तर अनेक शास्त्रज्ञांनीही याबाबत दावे केले आहेत.

काय आहे शास्त्रज्ञांचा दावा

मधुमेह नियंत्रित करण्यासाठी, लोक अनेक घरगुती उपाय देखील वापरतात, ज्याचा साखरेच्या पातळीवर काही प्रमाणात परिणाम होतो. सुमारे २ वर्षांपूर्वी शास्त्रज्ञांच्या एका गटाने असा दावा केला होता की कांद्याच्या माध्यमातून मधुमेह नियंत्रित केला जाऊ शकतो. संशोधनातून त्यांनी सांगितले होते की कांद्याच्या अर्काचे सेवन केल्याने रक्तातील साखरेची पातळी ५०% कमी होऊ शकते. उंदरांवर केलेल्या अभ्यासाच्या आधारे शास्त्रज्ञांनी हा दावा केला आहे. शास्त्रज्ञांनी तर कांदा हा मधुमेहावरील सर्वात स्वस्त आणि सहज उपलब्ध उपचार म्हणून घोषित केला आहे. कांद्याचा अर्क आरोग्यासाठी उत्तम असू शकतो.

शुगरवर नियंत्रण आणण्यासाठी कांदा

ब्रिटीश वेबसाइट एक्सप्रेसच्या वृत्तानुसार, रक्तातील साखर नियंत्रित करण्यासाठी कांद्याचे सेवन हा सर्वात स्वस्त आणि प्रभावी मार्ग असू शकतो. या संशोधनानुसार, कांद्याच्या अर्काला एलियम सेपा म्हणून ओळखले जाते. मेटफॉर्मिन सारख्या औषधांसोबत घेतल्यास ते मधुमेहावर मोठ्या प्रमाणात नियंत्रण ठेवू शकते. मेटफॉर्मिन हे एक सामान्य औषध आहे जे मधुमेह नियंत्रित करण्यासाठी सर्वात जास्त वापरले जाते. या संशोधनाच्या प्रमुख संशोधकाने सांगितले की, मधुमेह नियंत्रित करण्यासाठी कांदा हा स्वस्त आणि सहज उपलब्ध होणारा उपाय आहे.

२०२२ मध्येही झाले होते संशोधन

२०२२ मध्ये सादर केलेल्या या संशोधनात, संशोधकांनी सांगितले होते की प्रयोगादरम्यान, मधुमेही उंदरांना ४०० मिलीग्राम आणि ६०० मिलीग्राम कांद्याचा अर्क देण्यात आला. यामुळे उंदरांच्या रक्तातील साखरेची पातळी अनुक्रमे ५०% आणि ३५% कमी झाली. याशिवाय कांद्याच्या सेवनाने उच्च कोलेस्ट्रॉल देखील कमी झाला. संशोधकांचे म्हणणे आहे की भविष्यात कांद्याचा अर्क मधुमेह नियंत्रित करण्यास मदत करू शकतो. कांद्याचा अर्क औषधी गुणधर्मांनी समृद्ध आहे आणि त्यात अनेक आरोग्य समस्यांपासून आराम देण्याची क्षमता आहे.

## मुंबईच्या लोकांना काय कळणार कोकणातील शिमग्याची मजा! पालखीचा नाद अन् शंकासुराची भिती, अनोखा असतो उत्सवाचा थाट



भारतात १३ मार्च रोजी होलिका दहन आणि १४ मार्च रोजी रंगपंचमीचा सण साजरा केला जाणार आहे. भारतातील अनेक भागात होळीचा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. शहरात राहणारी लोक एकमेकांना रंग लावून रंगपंचमी साजरी करतात. पण होळी म्हटलं तर फक्त होलिका दहन आणि रंगपंचमी एवढेच आहे का? तर नाही. होळी खेळण्याची खरी मजा तर कोकणात येते. शहरातील लोकांना काय समजणार कोकणातील शिमग्याची मजा, असं बोलतात ते काही खोटं नाही.

महाराष्ट्रातील कोकण भागात, होळीला कोकणातील शिमगा असे म्हणतात. हा एक उत्साही आणि सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध सण आहे जो रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड आणि गोव्याच्या काही भागात साजरा केला जातो. दहा ते पंधरा दिवसांच्या या उत्सवात होलिका दहन, रंगपंचमी आणि पालखी उत्सव यासारख्या परंपरांचा समावेश आहे. गणपती नंतर होळी हा कोकणातील सर्वात मोठा सण आहे आणि हा उत्सव सुमारे पंधरा दिवस विविध पारंपारिक विधींसह साजरा केला जातो. हिंदू कॅलेंडरनुसार फाल्गुन महिन्याच्या पाचव्या दिवशी होलिक दहन केलं जातं जिथे आजूबाजूच्या पाच गावातील गावकरी गावाच्या मैदानावर आयोजित या उत्सवात सामील होतात. कोकणातील होळीचे प्रमुख आकर्षण म्हणजे संकासूर आणि पालखी. संकासूराच्या वेशात पेटलेल्या होळीच्या पाच फेऱ्या मारणारा आणि आगीतून धावणारा एक माणूस कोकणातील शिमग्याचे एक प्रमुख आकर्षण आहे. कोकणातील होळी उत्सवादरम्यान समाज आणि स्थानिक मंदिराच्या कल्याणासाठी देणग्या गोळा करण्यासाठी लोक 'संकासूर'सारखे कपडे घालतात. ही कोकणातील पिढ्यानपिढ्या सुरु असलेली परंपरा आहे.

कोकणातील शिमगा म्हणजे १० दिवसाआधीपासून सुरू होणारे होलिका दहन आणि त्यानंतर होम आणि पालखीची मजा. पालखी खांद्यावर घेऊन नाचण्याची मजा फक्त कोकणातच येते. खरं तर कोकणात होळीला एक वेगळाच उत्साह असतो. मुंबईतील चाकरमानी पालखीच स्वागत करण्यासाठी कोकणात जातात. सहा सहा महिने बंद असणारी घर होळीच्या निमित्ताने पुन्हा उघडली जातात. गावातील ओसाड शांतता आनंदी वातावरणात बदलते. अहो कोकणातील शिमग्याची गोष्टच वेगळी आहे. शिमग्याला पालखी खांद्यावर घेताना प्रत्येकाच्या चेहऱ्यावर जो आनंद आणि उत्साह दिसतो तो कोणत्याही मौल्यवान दागिन्याशिवाय कमी नाही. कोकणातील शिमगा पाहण्यासाठी अगदी दुरून लोक कोकणात येतात. शिमग्याच्या निमित्तानं वर्षभर न भेटलेली मंडळी पुन्हा एकत्र येतात. एकमेकांना मिठी मारून होळीच्या शुभेच्छा देतात. होलिका दहन झाल्यानंतर दुसऱ्या दिवशीपासून पालखी चाकरमान्यांना आशीर्वाद देण्यासाठी त्यांच्या घरी जाते. शिमग्याला कोकणातील माणसं गावी जातात कारण त्यांचा देव त्यांना आशीर्वाद देण्यासाठी त्यांच्या घरी येतो. रात्री ज्या चारमान्याच्या घरी पालखी वस्तीला असेल त्या घरी सर्व गावकरी जमतात आणि रात्रभर मजा मस्ती करत भजन म्हणतात. होळीचा सण म्हणजे केवळ रंग खेळणे किंवा गुलाल उधळणे एवढंच नसत, तर कोकणात जाऊन मानाची पालखी खांद्यावर घेऊन नाचावणं यात देखील एक वेगळाच आनंद असतो. कोकणातील प्रत्येक गावात प्रत्येक वाडीची मनाची पालखी असते. प्रत्येकजण त्यांच्या वेगळ्या अंदाजात आणि तालासुरात पालखी नाचवण्याचा आनंद घेतो. आणि अशा प्रकारे साजरा केला जातो कोकणातील शिमगा.

## यंदाच्या होळीला घरीच बनवा रसाळ अन् कुरकुरीत जिलेबी; फार सोपी रेसिपी

होळीचा सण आता जवळ आला आहे, घरोघरी यानिमित्त रुचकर पदार्थ तयार केलेजातात. आता सण म्हटलं की, गोडाचे पदार्थ आलेच. आजकाल बाजारात भरपूर भेसळयुक्त उत्पादने उपलब्ध असल्याने आरोग्यासाठी उत्तम दर्जाचे तेल किंवा तूप घरीच वापरणे चांगले. बाजारातील मिठाई आरोग्यास हानी पोहोचवू शकते. होळीनिमित्त घरी अनेक चवदार गोडाचे पदार्थ बनवले जातात, यातीलच एक म्हणजे कुरकुरीत जिलेबी. आज आम्ही तुम्हाला घरच्या घरी चविष्ट, रसाळ आणि कुरकुरीत जिलेबी घरी कशी बनवायची याची एक सोपी रेसिपी सांगत आहोत. सणानिमित्तची ही रेसिपी घरातील सर्वांनाच खुश करेल आणि सणाची मजाही द्विगुणित करेल. अनेक वेळा लोकांना रेस्टॉरंटसारखी जलेबी घरी बनवता येत नाही. जर तुमच्यासोबतही असे घडत असेल तर आम्ही तुम्हाला घरी हलवाई स्टाइल जलेबी कशी बनवायची ते आज सांगणार आहोत. चला जाणून घेऊया यासाठी लागणारे साहित्य आणि कृती.





साहित्य मैदा – १/२ कप सुती कापड बेकिंग पावडर– १/२ टेबलस्पून दही – १ टेबलस्पून कॉर्न फ्लोअर – १ टेबलस्पून पाणी – २ कप पिवळा रंग – १ चिमूटभर देशी तूप – तळण्यासाठी साखर – २ कप पाणी – २ कप वेलची पावडर– १/२ टेबलस्पून कृती हलवाई सारखी कुरकुरीत आणि रसाळ जिलेबी बनवण्यासाठी सर्वप्रथम एका भांड्यात मैदा, कॉर्न फ्लोअर, बेकिंग सोडा आणि पाणी एकत्र करा यानंतर या मिश्रणात दही घालून चांगले मिसळा हे द्रावण जास्त पातळ करू नका, कारण त्यामुळे चांगली जिलेबी बनत नाही आता त्यात पिवळा अथवा केशरी रंग घालून मिक्स करा नंतर सरबत तयार करण्यासाठी एका पातेल्यात २ कप पाणी घालून उकळा सरबत चांगले तयार झाल्यावर गॅस बंद करा लक्षात ठेवा की जिलेबीचे पाक जास्त पातळ किंवा जास्त घट्टही व्हायला नको यानंतर एका पातेल्यात तूप घालून गरम करा आता तयार मिश्रण एका सुती कापडात ठेवून त्यात छिद्र करून हाताने दाब देऊन जिलेबीला आकार द्या जिलेबी दोन्ही बाजूंनी शिजवून तुपात छान कुरकुरीत तळून घ्या दोन्ही बाजूंनी शिजल्यावर जिलेबी बाहेर काढून साखरेच्या पाकात काही तास बुडवून ठेवा यानंतर पाकमधून जिलेबी काढून गरमागरम सर्व्ह करा

## होळीच्या रंगांमुळे केस खराब होऊन जातात? केसांची काळजी घेण्यासाठी 'या' टिप्स करा फॉलो, केस राहतील निरोगी

होळी आणि रंगपंचमी सणाला अवघे काही तास शिल्लक राहिले आहेत. संपूर्ण देशभरात होळी वेगवेगळ्या पद्धतीने साजरा केली जाते. रंगपंचमीच्या दिवशी सगळीकडे एकमेकांना रंग लावला जातो. याशिवाय पाण्याच्या पिचकाऱ्या, बंदुकी, हर्बल रंग इत्यादी अनेक गोष्टी आणल्या जातात. पण होळी खेळताना एकमेकांना रंग लावताना कोण कोणाला कोणता रंग लावेल हे सांगता येत नाही. त्यामुळे होळी खेळताना स्वतःच्या आरोग्याची त्वचा आणि केसांची जास्त काळजी घेणे आवश्यक आहे. अनेकदा होळीच्या केमिकलयुक्त रंगांमुळे केस आणि त्वचेला हानी पोहचण्याची शक्यता असते. केमिकलयुक्त रंगांमुळे त्वचा आणि केसांचे नुकसान होण्याची शक्यता असते. केमिकलयुक्त रंगाचा वापर होळी खेळताना केमिकलयुक्त रंगाचा वापर करण्याऐवजी हर्बल आणि नैसर्गिक पद्धतीने बनवण्यात आलेल्या रंगाचा वापर करावा. यामुळे केस आणि त्वचेचे नुकसान होत नाही. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला होळी खेळताना केसांची कशी काळजी घ्यावी? याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत. या टिप्स फॉलो केल्यामुळे केसांचे कोणतेही नुकसान होणार नाही. रंगपंचमी खेळताना या पद्धतीने घ्या केसांची काळजी: होळी खेळ्याआधी केस आणि त्वचेच्या आरोग्याची जास्त काळजी घ्यावी. अन्यथा केसांचे नुकसान होऊन केस कोरडे आणि निस्तेज होऊन जातील. होळी खेळायला जाण्याआधी केसांना भरपूर तेल लावावे. केसांना तेल लावल्यामुळे केसांचे नुकसान होणार नाही. याशिवाय केसांच्या मुळांपासून ते अगदी शेवटच्या टोकापर्यंत सगळीकडे केसांना व्यवस्थित तेल लावावे. यामुळे केसांच्या मुळांमध्ये थेट रंग जाणार नाही. होळी खेळायला जाताना केस मोकळे सोडून जाऊ नये. यामुळे केसांचे नुकसान होऊ शकते. केमिकलयुक्त रंगाचा वापर केल्यामुळे केसांची गुणवत्ता खराब होऊन जाते. त्यामुळे होळी खेळायला जाताना वेणी किंवा घट्ट अंबाडा बांधून जावे. होळी खेळायला जाताना रंग लावून उन्हात जाणे टाळावे. ऊन आणि केमिकलयुक्त रंगांमुळे केसांचे जास्त नुकसान होते. होळी खेळायला जाताना डोक्यात कोणी रंग टाकला तर डोक्यात लगेच पाणी टाकावे. यामुळे केसांमधील रंग लगेच निघून जाईल आणि केस काही प्रमाणात स्वच्छ होतील. याचा केस आणि डोक्यावर कोणताच परिणाम दिसून येणार नाही. रंग खेळून आल्यानंतर केसांमधील रंग स्वच्छ करण्यासाठी शँम्पूचा जास्त वापर करू नये. शँम्पूच्या अतिवापरामुळे केसांचे नुकसान होण्याची शक्यता असते.

## चविष्ट आणि पौष्टिक असा नाश्ता शोधताय? मग झटपट घरी बनवा पालक-मूग डाळ डोसा

सकाळचा नाश्ता आपल्या आरोग्यासाठी खूप फायद्याचा असतो. यामुळे दिवसभर आपल्या शरीरात ऊर्जा कायम राहते. सकाळचा नाश्ता दिवसभर आपल्याला काम करण्यासाठी ऍक्टिव्ह ठेवत असतो, त्यामुळे तो कधीही स्किप करू नये. बाहेरचे अरबट चरबट खाल्ल्यामुळे अनेकजण लठ्ठपणाच्या समस्येने ग्रस्त आहेत, अशात लोक नाश्त्यासाठी एका पौष्टीक पण स्वादिष्ट अशा रेसिपीच्या शोधात असतात. तुम्हीही हेल्दी रेसिपी शोधत असाल तर आजची ही रेसिपी तुमच्या कामाची ठरेल.

जर तुम्ही पौष्टिक आणि आरोग्यदायी काहीतरी शोधत असाल तर पालक मूग डाळ डोसा हा एक उत्तम पर्याय आहे. हा एक पौष्टिक आणि ग्लूटेन मुक्त डोसा आहे जो तुमच्या नाश्त्यासाठी योग्य आहे. मूग डाळीतील प्रथिने आणि पालकातील लोह या पदार्थाची ताकद दुप्पट करते. शिवाय हा डोसा सहज आणि झटपट बनून तयारही होतो. चला जाणून घेऊया यासाठी लागणारे साहित्य आणि कृती.






साहित्य १ वाटी भिजवलेली मूग डाळ एक कप पालक एक कप कोथिंबीर २ ते ३ हिरव्या मिरच्या ट इंच आले जिरे मीठ किसलेले गाजर आणि कांदे सांबार मसाला कृती पालक डाळ मूग डोसा बनवण्यासाठी सर्वप्रथम भिजवलेली मूग डाळ काहीतास पाण्यात भिजवून ठेवा

यानंतर एका बाऊलमध्ये वाटलेली मूग डाळ, पालक, कोथिंबीर, हिरवी मिरची, आले, जिरे आणि मीठ एकत्र करून डोसासारखे पीठ तयार करा

यानंतर, गरम पॅनमध्ये तेल शिंपडा आणि नंतर त्यावर पिठ घालून डोशाप्रमाणे पसरवा

आता यावर किसलेले गाजर आणि कांद्याचे तुकडे घाला (तुम्हाला हवे असल्यास तुम्ही यावर किसलेला बिट देखील घालू शकता)

डोसा काही मिनिटे तव्यावर तसाच राहूद्या आणि त्यांनतर डोसा उलटा

दोन्ही बाजूंनी डोसा कुरकुरीत होईपर्यंत छान शिजवा आणि मग एका प्लेटमध्ये काढा

तयार डोसा नारळाची चटणी आणि सांबारसह खाण्यासाठी सर्व्ह करा

# बाबुरावजी आडसकर महाविद्यालय केज येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष शिबिराचा समारोप कासारी येथे संपन्न

## निबंध, रांगोळी व भित्तीपत्रक स्पर्धेतील विजेत्यांचा झाला गौरव

केज/प्रतिनिधी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर आणि श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्था संचलित बाबुरावजी आडसकर महाविद्यालय, केज यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजनेच्या वार्षिक विशेष शिबिराचे आयोजन कासारी ता.केज येथे दिनांक ६ मार्च ते १२ मार्च २०२५ या कालावधीत करण्यात आले होते.

विशेष शिबिराचा समारोप दिनांक १२ मार्च २०२५ रोजी उत्साहात झाला. समारोपाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अनिल किर्दंत हे होते. अध्यक्षीय भाषणात त्यांनी युवकांच्या जबाबदारीवर भर देत असे मत व्यक्त केले की, आजचा युवा हा उद्याचा भारत आहे आणि त्याने डिजिटल साक्षर असणे ही काळाची गरज आहे. तंत्रज्ञानाच्या युगात तरुणांनी डिजिटल साधनांचा योग्य वापर करून समाजहित साधावे.व्यासपीठावर क्रांतिवीर आत्माराम बापू पाटील माध्यमिक विद्यालय, कासारी या शाळेचे मुख्याध्यापक चोले व्हि.डी. व डॉ.छत्रभुज इंगळे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. डॉ . इंगळे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या या सामाजिक कार्याची प्रशंसा केली आणि विद्यार्थ्यांनी यातून समाजसेवेची प्रेरणा घ्यावी, असे आवाहन केले. या शिबिरात स्वयंसेवकांसाठी विविध समाजोपयोगी उपक्रम यामध्ये ग्रामस्वच्छता मोहीम, वृक्षारोपण, आरोग्य तपासणी शिबिरे, डिजिटल साक्षरता कार्यशाळा, स्वच्छता जनजागृती रॅली आणि व्यक्तिमत्व विकास सत्रे यांचा समावेश होता.



स्वच्छता अभियानात चिंचपुर मारुती देवस्थानचा परिसर स्वच्छ केला. विद्यार्थ्यांच्या विविध कला गुणांना वाव मिळावा म्हणून भित्तीपत्रके,निबंध व रांगोळी स्पर्धेतील विजेत्यांना सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा.यादव जे. बी. यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. क्षीरसागर पी.बी. यांनी केले, तर आभारप्रदर्शन प्रसिद्धी विभागाचे डॉ.बी.जे.हिरवे यांनी केले.

या विशेष शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा.जे.बी.यादव, प्रा. डॉ. बोबडे ए.आर.डॉ.शाम सरसरे , डॉ.टी.एस.बिडवे,डॉ.सुधीर आगळे,डॉ.प्रमोद काळम, युवराज डोईफोडे यांनी विशेष मेहनत घेतली. महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक यांनी शिबिर यशस्वी केले.

# भिमशक्ती सामाजिक संघटनेच्या बैठकीत अंबाजोगाई, परळी तालुका अध्यक्षपदाची निवड

अंबाजोगाई/प्रतिनिधी भीमशक्ती सामाजिक संघटनेचे बीड जिल्ह्याचे कार्याध्यक्ष मा. भिमराव सरवदे,यांच्या मार्गदर्शनाखाली अंबाजोगाई रेस्ट हाऊस येथे व्यापक बैठक घेण्यात आली या बैठकीमध्ये अंबाजोगाई तालुका अध्यक्ष व परळी तालुका अध्यक्ष तसेच उपाध्यक्ष चिटणीस युवा अध्यक्ष पदाच्या नियुक्ती जाहिर करण्यात आल्या, यावेळी बीड जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष डॉ. अमरेंद्र विद्यागर यांनी नियुक्तीपत्र देऊन पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या यावेळी उपस्थित, महाराष्ट्र उपाध्यक्ष हरिश्चंद्र विद्यागर, मराठवाडा संघटक, प्रा. चंद्रकांत खरात सर, डॉ. शेरखाने कार्याध्यक्ष बीड, यशपाल बनसोडे, जि. उपाध्यक्ष, राष्ट्रपाल पाटोळे जि.संघटक, यांच्या उपस्थितीत, सुमित सुरेश आवाडे, आंबेजोगाई तालुकाध्यक्ष, पंडित वसंतराव मुंडे, परळी तालुका अध्यक्ष. भीमराव धोंडोबा सरवदे जि उपाध्यक्ष बीड, संघर्ष सतीश इंगळे सरचिटणीस आंबेजोगाई तालुका, संकेत रघुनाथ तरकसे युवा तालुकाध्यक्ष आंबेजोगाई, अशाप्रकारे निवडी करण्यात आल्या कार्यक्रमाचे



आभार कार्याध्यक्ष भीमरावजी सरवदे साहेब यांनी मानून नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या, या वेळी भिमशक्ती सामाजिक संघटनेच्या नवनिर्वाचित पदाधिकारी यांना मराठवाडा संघटक प्रा. चंद्रकांत खरात सर यांनी पुढील कार्यास शुभेच्छा देत, संघटना वाढीसाठी कार्य करावे असे आवाहन केले.

# स्वानंद सार्वजनिक वाचनालयात छ.संभाजी महाराज बलिदान दिन व महाराजा सयाजीराव गायकवाड जयंती आणि यशवंतराव चव्हाण जयंती संपन्न

केज/प्रतिनिधी स्वानंद सार्वजानिक वाचनालय, आनंदगांव ता. केज जि. बीड येथे दिनांक ११ मार्च २०२५ रोजी छ.संभाजी महाराज बलिदान दिन व महाराजा सयाजीराव गायकवाड जयंती अत्यंत साधेपणाने साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी ग्रंथालयाचे संस्थापक अध्यक्ष, जेष्ठ विचारवंत, जेष्ठ समाजसेवक, प्राचार्य डॉ. वसुदेव( बप्पा) गायकवाड हे होते. प्रमुख अतिथी म्हणून महेश गायकवाड, बाळासाहेब गायकवाड यांची उपस्थिती होती.




सर्वप्रथम महेश गायकवाड व बाळासाहेब गायकवाड यांच्या हस्ते छ.संभाजी महाराज व महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पन करून पुजन व वंदन करण्यात आले. दिनांक १२ मार्च २०२५ रोजी जेष्ठ स्वातंत्यसेनानी, महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चवहाण यांची जयंती अतंत्य साधेपणाने साजरी करण्यात आली. अध्यक्षस्थानी डॉ. वसुदेव( बप्पा) गायकवाड हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी सरपंच रामराजे गायकवाड, बबन पुंड, रावसाहेब गायकवाड यांची उपस्थिती होती. सर्वप्रथम यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेचे पुजन पुष्पहार अर्पण करून करण्यात आले. रामराजे गायकवाड, बबन पुंड, रावसाहेब गायकवाड यांच्या हस्ते पुजन करण्यात आले. दोन्ही दिवशी वेगवेगळ्या कार्यक्रमाचे प्रस्ताविक, सुत्रसंचलन, आभार प्रदर्शन ग्रंथालयाचे आनंद( भैय्या) गायकवाड यांनी केले.

# जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी शाळेत क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांची पुण्यतिथी साजरी.



केज/प्रतिनिधी जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा तरनळी केंद्र लव्हुरी ता.केज शाळेत क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमेस श्रीमती गितातार्इ जीवराज अंडील मॅडम व श्री राजाभाऊ दत्तात्रय कदम अपग्रेड मुख्याध्यापक यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले व पुण्यतिथी साजरी करण्यात आली.प्रास्ताविक राजाभाऊ दत्तात्रय कदम अपग्रेड मुख्याध्यापक यांनी केले. सर्व शिक्षक, शिक्षिका, विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्री बाळासाहेब भिल्लु राठोड सर यांनी केले.श्रीमती सोनाली भारतराव भुमकर मॅडम यांनी आभार मानले. कार्यक्रमास शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष संपत्ती सुदाम सरवदे, उपाध्यक्षा सीमा सुधीर मोहिते, सदस्य,राधा आक्का खामकर, गावकरी उपस्थित होते.

# कर्जबाजारी शेतकऱ्याची आत्महत्या

किनवट: शेख शौकत :–माहूर तालुक्यातील अतिदुर्गम भागात असलेल्या मौजे मुंगशी येथील विनोद विजय जाधव वय ५० वर्ष या शेतकऱ्याने कर्जबाजारीपणाच्या चिंतेने जंगलातील सागवानाच्या झाडाला नायलॉन दोरीने गळफास घेऊन आत्म हत्या केल्याची घटना दि १० दहा रोजी सकाळी १० वाजता घडली आहे. माहूर तालुक्यातील मौजे मुंगशी येथील रहिवासी विनोद जाधव यांच्याकडे तीन एकर शेती असून त्यांना आई–वडील पत्नी दोन मुले मुलगी आहे मुलीचे लग्न झाले आहे त्यांचे वर बँकेचे कर्ज होते ते कर्ज कसे फेडावे या तणावात ते सतत राहत होते आज दि १० सकाळी घरून शेतात जातो म्हणून निघाले असता मुंगशी शिवारातील विष्णू पिटलेवाड यांच्या शेता शेजारी असलेल्या जंगलातील सागवानी झाडाला त्यांनी दहा वाजताच्या सुमारास नायलॉन दोरीने गळफास घेऊन आत्महत्या केली सदरील बाब नागरिकांना माहित झाल्याने तत्काळ माहूर पोलीस ठाण्यात घटनेची कल्पना दिली. घटना माहीत झाल्याने सपोनी शिवप्रकाश मुळे यांनी तात्काळ पोहेका प्रकाश गेडाम पोका



ज्ञानेश्वर वेलदोडे यांना घटनास्थळी पाठवून पंचानामा करत शव वानोळा येथील रुग्णालयात आणले असता येथे डॉ शिवाजी आत्राम यांनी शवविच्छेदन केले सपोनी शिवप्रकाश मुळे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास पोहेका प्रकाश गेडाम पोका ज्ञानेश्वर वेलदोडे करीत आहेत विनोद जाधव यांची आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने त्यांना तात्काळ शासकीय मदत द्यावी अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

# गांधी चौक पोलीस स्टेशन येथील बेवारस वाहनांबाबत आवाहन

लातूर :- शहरातील गांधी चौक पोलीस स्टेशन येथे ५० वाहने बेवारस स्थितीत आहेत. या वाहनांवर ज्या कोणाची मालकी असेल, त्यांनी १५ दिवसांत मालकविषयक कागदपत्रासंह गांधी चौक पोलीस स्टेशन येथे संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. गांधी चौक पोलीस स्टेशन येथे असलेली ५० वाहने भारतीय नागरी सुरक्षा संहिता १०६ (१०२ सीआरपीसी) , १२४ म.पो.का. प्रमाणरे कार्यवाही करुन ताब्यात घेण्यात आली आहेत. या वाहनांच्या रजिस्टर क्रमांक, इंजिन क्रमांक, चेसीस क्रमांकची माहिती गांधी चौक पोलीस स्टेशन येथे उपलब्ध आहे. विहीत मुदतीत कोणाचीही मालकी हक्क सिध्द न झाल्यास कोणाचीही तक्रार नाही, असे गृहीत धरुन मुंबई पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ८७ व फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम ४५८ प्रमाणे कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे कळविण्यात आले आहे.

# साबला गाव पाणीदार करण्यासाठी एआरटी संस्था यवतमाळ यांनी घेतला पुढाकार .

केज/प्रतिनिधी केज तालुक्यातील साबला गाव हे नेहमी कोणत्यान कोणत्या कारणान चर्चेत असत. त्यातच आता साबला या गावात भर पडली . ती म्हणजे पाणी टंचाईची . बऱ्याच वर्षापासून या गावाला पाणी टंचाईचा सामना करावा लागतो . याची दखल ही जिल्हा यवतमाळ येथील एआरटी क्शन रुरल टॅक्नॉलॉजी संस्था यवतमाळ . या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुहासराव धस , जलसंधारण तज्ञ पवनराव नखाते , प्रकल्प व्यवस्थापक वली तांबोळी यांनी पुढाकर घेऊन केज तालुक्यातील साबला हे गाव दत्तक घेतले आहे . आणि या गावाला टॅंकर मुक्त करण्यासाठी या गावाची निवड केली आहे . साबला या गावाच्या परिसरातील लहान ओढे , नाले , नद्या यातील गाळ काढून त्याचे रूंदीकरण करणे , त्यामध्ये पाणी अडवण्यासाठी बॉक्स बनवणे . पाऊस पडल्यानंतर पावसाचे पाणी जमिनीत मुरले पाहिजे . म्हणजे यानंतरच्या पुढील काळात या गावातील नागरिकांना तसेच , पशु , पक्षी , प्राणी यांना पाण्याची कसलीही अडचण येणार नाही . यासाठी सर्वोतरी सहकार्य करण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत.


या कामाचा शुभारंभ उपसरपंच श्रीमती कचराबाई राजेंद्र सरवदे



, समाजसेवक नरहरी काकडे , ग्रामपंचायत अधिकारी माननीय धनराज सोनवणे , चेरमण उत्तमराव काकडे , माजी सरपंच मधुकर काकडे , माजी सरपंच महादेव कटारे , ग्रामरोजगार सेवक दत्तकुमार काकडे , ग्रामपंचायत सदस्य ज्ञानेश्वर पांचाळ , पोपट काकडे , मेजर बबनराव मुळे , माजी ग्रामपंचायत सदस्य रामराजे शिंदे , श्रीमंत नाईकनवरे , आश्रुबा काकडे , सेवा सहकारी सोसायटी संचालक सदाशिव काकडे , तसेच बाबुराव काझी , पवन सरवदे , जालींदर मुळे , अनिल भोसले , संजिवन नाईकनवरे , सुदामराव राऊत , रामभाऊ काकडे , गोरख काकडे , बप्पा काकडे , तात्याराम मुळे , विश्वनाथ नाईकनवरे , उत्तमभाऊ काकडे , राजेभाऊ काकडे , विलास काकडे , जगन्नाथ काकडे , सुभाषराव काकडे , गुलाब मुळे ,राम काकडे , सावताराम नाईकनवरे , सुदामराव नाईकनवरे इत्यादी गाववकऱ्यांच्या उपस्थितीत या कामाचा शुभारंभ करण्यात आला .

# इस्लाम धर्माचा पवित्र रमजान महिन्यात १०वर्षीय आयशा फातिमा सय्यद इमरान अली ने ठेवला आयुष्यातील पहिला रोजा

किनवट: शेख शौकत :–इस्लाम धर्मात पवित्र रमजान या महिन्याला अनन्य महत्व प्राप्त आहेया महिन्यात सर्वच मुस्लिम बांधव यांच्यावर वयाच्या दहाव्या वर्षा पासून रोजा (उपवास) फर्ज (सक्तीचें) असतात.लहानपासून मोठ्यापर्यत या महिन्यांमध्ये ३० दिवस रोजा धरत असतात. पालकांचे पाहून लहान मुलांनाही रोजा धरण्याची लालसा निर्माण होते. त्यामुळे लहान चिमुकले ही मोठ्यांचे अनुकरण करीत रोजा (उपवास) धरतात.अशाच प्रकारे किनवट येथील पत्रकार सय्यद इमरान अली यांची १० वर्षाची मुलगी आयेशा फातिमा यांनी आपल्या जीवनातील पहिला रोजा रविवार ९ मार्च रोजी पूर्ण केला.मुस्लिम समाजात पवित्र असणाऱ्या या महिन्यात संपूर्ण महिनाभर दिवसभर पाणी न पिता उपवास ठेवला जातो.यावर्षी रोजा (उपवास) सकाळी ५.१० वाजता सुरू होत असून संध्याकाळी ६.२८ला रोजा सोडण्याची वेळ आहे.१३ तासा पेक्षा जास्त वेळचा उपवास असल्याने या उष्णतेचा मोठ्या माणसांनादेखील खूप त्रस होतो.त्यात या चिमुकल्यानी पहिला रौजा ठैवून आपल्या आयुष्याची सुरुवात एक चांगल्या प्रकारे व्हावी या हेतूने उपवास ठैवली.त्यामुळे आयेशा फातिमा सय्यद इमरान अली यांचे सर्व्र कौतुक होत आहे.



# यशस्विनी सन्मान सोहळा उत्साहात

लातूर: जागतिक महिला दिनानिमित्त बाबासाहेब परांजपे फाऊंडेशन च्या वतीने यशस्विनी सन्मान सोहळ्यात विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रूग्णालयातील नर्सिंग ऑफिसर श्रीमती बेबी मनोहर कांबळे – सोनवणे यांचा सामाजिक कार्यकर्ते डॉ.मायताई कुलकर्णी यांच्या हास्ते स्मृती चिन्ह देऊन सन्मानित करण्यात आला. यावेळी योग शिक्षीका सौ.नंदिनी पडीले, सामाजिक कार्यकर्त्या,माजी नगरसेवक अर्चना आल्टे, श्रीमती वैशाली चव्हाण, श्रीमती रूपाली मोरे, प्रा. डॉ.सुशिला पिंपळे यांचा सन्मान ही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुणे डॉ. माया ताई कुलकर्णी, रजनीताई वैद्य, प्रा.डॉ. कल्पना अनवले या व्यासपीठावर







उपस्थित होत्या. यांच्या हास्ते यशस्विनी महिलांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रारंभी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.यावेळी सत्काराला उत्तर म्हणून श्रीमती वैशाली चव्हाण, प्रा. डॉ. सुशिला पिंपळे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमांचे प्रास्ताविक प्रा. डॉ . अनिलकुमार जायभाय यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन भिम दुनगावे यांनी केले. अभार भाऊसाहेब उमाटे यांनी मानले. कार्यक्रमाल महिला, पुरूष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE